# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१ ०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१० फॅकस ०२२ २२०१८५३९
E-mail : mah-sforum@nic.in Website:- www.grahak.maharashtra.gov.in

---

जा.क्र.राआ/महा./आस्था/शिपाई/निविदा/२०/७४४ दि - ६ फेब्रुवारी, २०२०

## निविदा सूचना

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई व अधिपत्याखालील परिक्रमा खंडपीठ नागपूर व औरंगाबाद व जिल्हा ग्राहक तक्रार मंच या कार्यालयाकरीता मासिक दरावर शिपाई- ५५ व रखवालदार-२ यांच्या सेवेची आवश्यकता आहे. त्यानुसार मासिक दरावर शिपाई व रखवालदार पुरविण्याबाबत निविदाधारकांकडून व्दि (Double)लिफाफ पध्दतीने ११ महिन्याकरीता तांत्रिक व आर्थिक निविदा मागविण्यात येत आहे.

उदयोग, उर्जा व कामगार विभागाच्या क्रमांक भांखस२०१४/प्र.क्र.८२/भाग III/उदयो ४, दिनांक ०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयानुसार स्पर्धेत भाग घेणा-या निविदाकाराने भरावयाच्या निविदा शुल्क ना-परतावा (Tender fee-Non refundable) आणि बयाणा रकमेचा तपशिल दिलेला असून त्यानुसार रु. १,१५,००,०००/- (अक्षरी एक कोटी पंधरा लाख)किंमतीपर्यंतच्या अंदाजित किंमतीसाठी स्पर्धेत भाग घेणा-या निविदाकाराने रु. १०,०००/- Tender fee आणि रु. १,००,०००/- बयाना रक्कम (EMD {INR})यांचा भरणा करणे आवश्यक राहील.

सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. या संदर्भात https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सूचना व विहित नमुन्यातील अर्ज प्रसिध्द करण्यात आला असून निविदाधारकांकडून खाली नमूद केलेल्या कालावधीत online तांत्रिक व आर्थिक निविदा अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्राप्त झालेल्या निविदापैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळल्याचे अधिकार मा.अध्यक्ष राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई राखून ठेवत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सेवेचा कालावधी | ११ महिने |
| २ | निविदा फॉर्म स्विकारण्याची तारीख | ०६/०२/२०२० सायंकाळी ६.३० वाजेपासून दि २०/०२/२०२० सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत |
| ३ | प्री-बिड बैठक | दि.१८/०२/२०२० दुपारी ३.०० वाजता (वरील नमुद कार्यालयीन पत्त्यावर ) |
| ४ | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख व वेळ | २०/०२/२०२० सायंकाळी ५.३० वाजता |
| ५ | तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक | २४/०२/२०२० दुपारी ३.०० वाजता किंवा राज्य आयोगाचे कार्यालय ठरवेल त्याप्रमाणे |
| ६ | आर्थिक निविदा उघडण्याची तारीख व वेळ | २६/०२/२०२० रोजी दुपारी ३.०० वाजता किंवा तांत्रिक निविदा उघडल्यानंतर दोन दिवसांनी मा.प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक आयोग, मुंबई यांचे दालनात |

सदर ई-निविदा करीता www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर विहित नमुन्यातील अर्ज प्रसिध्द करण्यात आला असून, ई-निविदा प्रकियेबाबतची संपूर्ण माहिती tender document मध्ये स्वतंत्र्यरित्या देण्यात आलेली आहे.

Sd/-

(एम.पी.भावसार)

प्रबंधक (प्रशासन)

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग

महाराष्ट्र, मुंबई

Signature Not Verified

Digitally signed by Mukund Pandurang Bhavsar

Date: 2020.02.06 18:07:55 IST

Location: Maharashtra-MH